


किंमत रु. १५/-

वर्ष १५ • अंक २ • १६ मे २०१५

# पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

**पा ल क नी ती**
पालकत्वाला वाहिलेले मासिक

**संपादक**
संजीवनी कुलकर्णी

**संपादक मंडळ**
प्रकाश अनभूले
मधुरा राजवंशी
वसीम मणेर
सोमीनाथ घोरपडे
नीला आपटे
मंजिरी निंबकर

**मुखपृष्ठ, अंक मांडणी व रेखाटने**
वसीम मणेर

**अक्षरजुळणी**
स्वाती जामदार

**जानेवारी ते डिसेंबर २०१५ साठी वर्गणी रु.२००**

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट 'पालकनीती परिवार' या नावाने काढावा.

**संपर्क :**
**पालकनीती परिवार,**
प्रगत शिक्षण संस्था
रिंग रोड, लक्ष्मीनगर,
फलटण ४११५२३
०२१६६ २२३०४१
psspalakneeti@gmail.com
www.palakneeti.org

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष १५ वे अंक २ रा
१६ मे २०१५

लेखांत व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.

# या अंकात

- **बदल शक्य आहे!**
  – आनंद पवार
- **मुलींना शिकवून तर पहा**
  – सिस्टर डॅफने सिकेरा
- **नकुसा ते लाडली ते....?**
  – गीताली वि. मं.
- **आमचा प्रश्न आमची उत्तरे**
  – प्रतिभा भराडे
- **विचार करून पाहू – मुलांचे ऐका!**
  – नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर
- **शहाणी वेबपाने – हवाओं सी बन रही हैं लडकियाँ...**
  – मधुरा राजवंशी

पालकनीती एप्रिल २०१५ चा अंक हा १५ व्या वर्षातील पहिला अंक होता. मात्र अनवधानाने मुखपृष्ठ व आतल्या पानावर वर्ष १४, अंक १२ असे छापले गेले आहे. याबद्दल दिलगीर आहोत.

–संपादक

संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक – डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ग्रीन ग्राफीक्स, सी–१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे–४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे–४११००४, येथे प्रकाशित केले.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

**दो**न तीन बातम्यांनी मागच्या काही आठवड्यात आधीच साठून असलेली अस्वस्थता आणखी वाढवली. एक: गुजरातमध्ये बलात्कारपीडित महिलेला न्यायसंस्थेने गर्भसमापन नाकारले. दोन: पंजाबमध्ये बसमध्ये झालेली आई व मुलीची लैंगिक छळवणूक व मुलीचा मृत्यू ही दैवी इच्छा आहे, त्याला कोण काय करणार असे पंजाबचे शिक्षणमंत्री म्हणाले आणि तीन: भारतीय संसदेत आवाज उठला की लग्नासारख्या पवित्र संस्थेत बलात्कार होतात ही संकल्पना भारतात मान्य होण्याजोगी नाही. स्त्री पुरुष समानतेच्या दिशेने नेटाने चालू असलेल्या सामाजिक चळवळीला अजून केवढा टप्पा गाठायचा आहे हे या बातम्यांनी दाखवून दिले.

अलीकडील काळात पुरुषांना संवेदनशील बनवण्याचे कामही सुरू झालेले असले तरी आपल्याला हवी असलेली लिंगभाव समानता गाठणे (पितृसत्ताक सामाजिक परिस्थितीमध्ये, स्त्रियांचे दुय्यम मानले गेलेले स्थान आणि त्या दुय्यम स्थानाचे जात, धर्म, आर्थिक स्तर यानुरूप असणारे विविध पैलू लक्षात घेता) फार अवघड होऊन बसले आहे.

पितृसत्ताक परिस्थितीत स्त्रियांना नाकारल्या जाणाऱ्या अनेक गोष्टींमध्ये प्रकर्षाने जाणवणारा भाग म्हणजे त्यांच्या शरीरावर असणारा त्यांचा हक्क. मूल कधी होऊ द्यायचे, होऊ द्यायचे की नाही, किती मुले असावीत, दोन मुलांमध्ये किती अंतर असावे असा कुठलाही निर्णय बहुतांश स्त्रिया आपल्या पतीच्या अथवा कुटुंबाच्या मर्जीबाहेर घेऊ शकत नाहीत, हे सत्य आपण जाणतोच. असे असताना गर्भपाताचा (ज्याला आता आपण संवेदनशीलपणे गर्भसमापन म्हणू लागलो आहोत) निर्णय स्त्रीच्या हातात कसा असणार?

स्त्री आणि तिच्या निर्णय हक्काची अशी सामाजिक पार्श्वभूमी असताना Creating Champions to Address Sex Selection and Improve Access to Safe Abortion नावाचा अभ्यासक्रम काही लोक तयार करत आहेत आणि त्यासाठी शिक्षित कार्यकर्त्यांची फौज तयार करत आहेत, हे केवढे धैर्याचे आणि

# संवादकीय

कष्टाचे काम आहे! यासंबंधीच्या दिल्ली येथे झालेल्या कार्यशाळेला उपस्थित राहण्यासाठी पालकनीती संपादक मंडळातील एका सदस्याची निवड झाली होती. त्या कार्यशाळेत समोर आलेल्या गोष्टी वाचकांमध्ये चर्चा आणि संवाद वाढवण्यासाठी इथे नमूद करीत आहोत.

भारतात ऐच्छिक गर्भसमापन कायदेशीर नाही. काही परिस्थितीत MTP-ACT (Medical Termination of Pregnancy Act) नावाच्या कायद्याअंतर्गत स्त्रीला गर्भसमापनाची सुविधा उपलब्ध आहे. या कायद्यानुरूप स्त्री काही प्राप्त परिस्थितींमध्ये नोंदणीकृत डॉक्टरकडून गर्भसमापन करून घेऊ शकते. तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर सोनोग्राफी तंत्र आले आणि गर्भलिंग तपासणी आणखी सोपी झाली. पुरुषसत्ताक पद्धतीमध्ये साहजिकच गर्भाशयात असलेल्या गर्भाचे लिंग पुरुष असेल तर जन्माला प्राधान्य असल्यामुळे स्त्रियांची संख्या वेगाने ढासळू लागली. मग गर्भलिंग तपासणी प्रतिबंधित करण्यासाठी कायदा आला– PCPNDT ACT. गर्भलिंग तपासणी करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई झाली. ही कारवाई काही ठिकाणी इतकी गंभीर होती की डॉक्टरांनी घाबरून स्त्रियांना MTP ACT नुसार कायदेशीर असणारे गर्भसमापनही नाकारायला सुरुवात केली. पश्चिम महाराष्ट्रात तर जिल्हा आणि तालुका पातळीवर डॉक्टरांनी संघटना बांधून सामूहिकरीत्या गर्भसमापनावर बहिष्कार टाकला. इथे आपण अनवधानाने आणि सोयीस्कररीत्याही स्त्रीच्या तिच्या शरीरावर असलेल्या हक्काची आणि तिच्या मर्जीची पायमल्ली करतो आहोत याचा विचार झाला नाही.

दुसऱ्या बाजूला 'स्त्री–भ्रूण हत्या' विरोधी प्रचाराचे स्वरूप इतके मोठे झाले की गल्ली–बोळातील दादा नेते मंडळी आपल्या वाढदिवसांचे फ्लेक्स लावताना त्यावर 'स्त्री–भ्रूण हत्या' विरोधी मजकूर लिहू लागले. गणेशोत्सव, शिवजयंती अशा अनेक सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांच्या फलकांवर 'स्त्री–भ्रूण हत्या' विरोधी मजकूर येऊ लागला. टीव्ही–इंटरनेटही 'आई मला वाचव' अशा भावनिक हाकेच्या व्हिडिओंनी भरून गेले.

खरे तर 'भ्रूण हत्या' असे म्हटल्यावर त्यास एक कुकर्माचा दर्प येतो. मनुष्याची हत्या ही मानव अधिकारांच्या विरोधी आहे. पण मानव अधिकार जन्माने मिळतात, जन्माआधी नाही हे आपण विसरतो. शिवाय 'भ्रूण हत्या' हा शब्द गर्भसमापनाला हत्या ठरवतो. त्यामुळे प्रत्येक गर्भसमापनाकडे 'हत्या' या निकषाने पाहिले जाते आणि त्याला विरोध केला जातो. यासाठी 'भ्रूण हत्या' हा शब्दच मुळात वापरात नसायला हवा. आपल्याला जर गर्भलिंगनिदानाला विरोध करायचा आहे तर आपण फक्त 'गर्भलिंगनिदान नको' असेच म्हणायला हवे आणि हे म्हणताना गर्भसमापनाचा उल्लेख करण्याची काहीच आवश्यकता नाही.

याचबरोबर हाही विचार करणे गरजेचे आहे की गर्भलिंग निवड ही काय फक्त गर्भाशयात असणाऱ्या भ्रूणाची होते? कायद्याने रोख लावून जन्माला आलेल्या मुलींच्या वाट्याला कसे आयुष्य येते हे आपण कधी पाहिले आहे का? मुलगी फक्त जन्माला येऊन उपयोग नाही तर तिला मुलग्यांबरोबर सर्व अधिकार आणि चांगले जीवनमान मिळाले पाहिजे, जे होताना फारसे दिसत नाही. सरकार एकीकडे बेटी बचाव आंदोलन उभे करते पण त्याच बेट्या मोठ्या होवून युवती, पोक्त आणि वृद्ध महिला झाल्यावर त्यांच्यासाठी कसलाही 'बचाव' किंवा त्याच्या हक्कांचे रक्षण करणारा कार्यक्रम आखताना दिसत नाही. या सर्वाला पूर्वापार चालत आलेली पुरुषसत्ताक समाज–मानसिकता आणि मान्यता कारणीभूत आहेत. त्यामुळे केवळ गर्भलिंगनिदानाला विरोध करण्याऐवजी तितक्याच गांभीर्याने पुरुषसत्ताक मानसिकता विरोधी काम केल्यास स्त्रियांच्या आयुष्यात निश्चित बदल घडेल.

तंत्रज्ञानावर बंदी घालून प्रश्न सुटणारे नाहीत. आज सोनोग्राफीचे तंत्र आहे, उद्या आणखी काही नवे तंत्र असेल. शिवाय गर्भलिंगनिदान कायद्याअंतर्गत केवळ अशा जोडप्यांवर आणि डॉक्टरांवर कायदेशीर कारवाई होते ज्यांनी गर्भाचे लिंग स्त्री असल्यास गर्भसमापन करवले. पण गर्भाचे लिंग पुरुष असल्यास आनंदाने मुलग्याला जन्माला घातलेल्या जोडप्यांच्या व त्या डॉक्टरांच्या विरोधात आपण काहीच करत नाही. PCPNDT ACT या कायद्यांतर्गत दोषी तेही आहेतच!

गर्भलिंग तपासणी कायद्याने गुन्हा आहे आणि त्यावर प्रतिबंध असलाच पाहिजे पण त्याचबरोबर MTP ACT अंतर्गत स्त्रीला सुरक्षित गर्भसमापनाची सुविधा मिळणेही तितकेच गरजेचे आहे.

मुद्दा हा आहे की आपण कधी मान्य करणार आहोत की स्त्री एक स्वतंत्र मानव आहे आणि तिचा तिच्या शरीरावर अधिकार आहे? तिच्या शरीरात होणाऱ्या बदलांच्या बाबतीत सर्व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य तिला आहे हे आपण समाज म्हणून मान्य करून त्यास कायदेशीर पाठबळ कधी देणार आहोत?

• • •

# बदल शक्य आहे!

– आनंद पवार



आनंद पवार 'सम्यक' या संस्थेचे कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत. पुरुषत्वाच्या पितृसत्ताक संकल्पना बदलून पुरुषांना माणूसपणाच्या वाटेने जाता यावे व स्त्रियांवर होणारा हिंसाचार थांबावा यासाठी ते स्त्री-वादी दृष्टिकोनातून काम करतात.

स्त्री-पुरुष समानतेचा मुद्दा समाजात चर्चेला आला की 'आता काही पहिल्यासारखे राहिलेले नाही' असा सूर लगेचच आपल्याला ऐकायला मिळतो. आता गोष्टी बदलल्या आहेत असे अनेकांना वाटत असते आणि त्यामागील कारणांचा शोध घेतला तर अनेकांच्या मनात समतेची प्रतीकात्मक समज असल्याचे लक्षात येते. मुली शिक्षण घेऊ लागल्या, गाड्या चालवू लागल्या, नोकरी करू लागल्या, त्यांची वेशभूषा बदलली, वैमानिक झाल्या अशा प्रतीकात्मक गोष्टींचा संदर्भ देऊन अनेकजण 'आता समानतेबद्दल बोलण्याची काय गरज आहे?' असा प्रश्न विचारतात. मी याला समानतेची प्रतीकात्मक समज किंवा प्रतीकांचा उपयोग करून समानतेचा निर्माण होणारा आभास असे म्हणतो. ते अशासाठी की ही प्रतीके किंवा हे बदल महत्त्वाचे असले तरी त्यामुळे स्त्री-पुरुषांमधील सत्तासंबंध बदलून खऱ्या अर्थाने समानता स्थापित झाली असे मात्र आपल्याला म्हणता येत नाही. मुली कमवू लागल्या, स्वतंत्र होऊ लागल्या म्हणून त्यांना येणारे छेडछाडीचे अनुभव किंवा त्यांचे होणारे 'वस्तूकरण' थांबले आहे असे आपल्याला म्हणता येत नाही. मुलींच्या केवळ प्रतिमा बदलल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने सबल होतात असे मुळीच नाही. म्हणूनच कदाचित शिक्षित-शहरी-आधुनिक पेहरावात असलेल्या अनेक तरुण नोकरदार स्त्रिया कौटुंबिक हिंसाचाराच्या अनेक केसेस घेऊन 'सम्यक' कडे येतात. प्रचंड आत्मविश्वासू, हुशार आणि जबाबदार तरुणींवर त्यांचे नवरे का बरे हिंसा करत असतील?

अनेक कहाण्यांचे विश्लेषण करता आमच्या असे लक्षात येते की, मुळात शिक्षित- आत्मनिर्भर- आत्मविश्वासू मुलींसोबत, स्त्रियांसोबत कसे राहायचे याचेच प्रशिक्षण व मानसिक तयारी पुरुषांची झालेली नसते. डबल पगाराच्या कुटुंब अर्थकारणाची शहरी, मध्यमवर्गीय गरज आणि बाजाराने निर्माण केलेल्या चंगळवादी संस्कृती यांच्या दबावाखाली 'वधू पाहिजे' सदरामध्ये मुलगी शिकलेली, कमवती हवी अशी अपेक्षा लिहिली जाऊ लागली. मात्र ती सोज्वळ, सहनशील असावी ही अलिखित अपेक्षाही ठेवली जाते. किशोरवयीन मुलींच्या पालकांच्या सभेत ''आमच्या मुलींना हुशार बनवा पण 'स्मार्ट' बनवू नका'' अशी अपेक्षा माझ्याकडे एका पित्याने व्यक्त केली होती. माझ्या आजवरच्या अनुभवामुळे मला असे वाटते की मुलींकडे समाज कसा पाहतो याचे वर्गरहित विश्लेषण करणे अर्धवट ठरेल.

शहरी झोपडपट्ट्यांमध्ये (वस्त्यांमध्ये) मात्र माझा अनुभव खूपच वेगळा आहे. वस्त्यांमध्ये एक प्रकारची जान असते, जिवंतपणा असतो. शहरी सहकारी सोसायट्यांमधील घरांची दारे बहुतेकदा बंदच असतात. मात्र वस्त्यांमधील घराची कवाडे आणि बहुधा मनेसुद्धा उघडी असतात. शहरी मध्यमवर्गीय मुलींपेक्षा वस्त्यांमधील मुली तथाकथित 'स्मार्ट' निकषामध्ये कमी पडत असतील पण त्या तुलनात्मकदृष्ट्या कित्येक पटीने मुक्त असल्याचे लक्षात येते. दिवसभरातील आपली शाळा, कॉलेज आणि त्यासोबत एखादी पार्टटाईम पगारी नोकरी करणाऱ्या मुली आपल्या वस्तीत परत आल्यानंतरही तितक्याच उत्साहाने वस्तीमध्ये अनेक कामे करतात. त्यांच्या पाठीशी दहावी-बारावीत शिक्षण सोडून लग्न करण्यास भाग पडलेल्या, लवकर लग्न झाल्यामुळे आपल्या मुलींपेक्षा फक्त १६-१७ वर्षांनीच मोठ्या असणाऱ्या, मोलमजुरी आणि नवऱ्याचा त्रास सहन करून मुलींना शिकवणाऱ्या खमक्या आया असतात. मुलीसुद्धा शिक्षणासोबतच टेलिफोन ऑपरेटर, दवाखान्यात रिसेप्शनिस्ट, उदबत्त्या किंवा मेणबत्त्यांच्या छोट्या कारखान्यांत काम, सोसायटीत राहणाऱ्या मुलांचा सांभाळ, आईच्या धुण्या-भांड्याच्या कामात मदत, एखाद्या कंपनीत तारा गुंडाळणे, सुट्टे भाग वेगळे करणे- भरणे अशी कामे, ब्युटीपार्लरमध्ये मदतनीस अथवा हातावर मेहंदी काढणे यासारख्या कामांमध्ये दिवसभर व्यस्त असतात. पण त्यासोबतच त्या वस्तीत परतल्यानंतर गप्पा-टप्पा, शेजाऱ्यांच्या मुलांचा अभ्यासवर्ग, नाच बसवणे, स्पर्धा भरवणे, सण- समारंभाची तयारी, घराबाहेर निवडणे-पाखडणे करणाऱ्या मावश्यांसोबत हसत खिदळत गप्पा इ. गोष्टी करत रात्री उशिरापर्यंत भटकत असतात. वस्तीतल्या या मुली त्यांच्या कोशातून बाहेर पडून स्वतःच्या आयुष्याला गवसणी घालू पाहात आहेत. मात्र त्यांचेही भेदभावाचे, छेडछाडीचे अनुभव कमी झालेले नाहीत.

पुण्यातील मीनाताई ठाकरे वसाहतीमध्ये आम्ही 'छेडछाड विरोधी समिती' स्थापन केली होती. वस्तीतील काही मुली, काही मुलगे व काही स्त्री-पुरुष यांनी एकत्र येऊन छेडछाड विरोधी समितीचे काम सुरू केले. वस्तीतील असुरक्षित जागा शोधणे, त्या असुरक्षित असण्याची कारणे शोधणे, अंधाऱ्या गल्ल्या शोधून त्यावर उपाययोजना करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे छेडछाड करीत कोपऱ्या-कोपऱ्यावर ठरावीक वेळी उभ्या राहणाऱ्या मुलग्यांशी संवाद साधणे असा तो उपक्रम होता. आमच्या असे लक्षात आले

की, अभ्यास वर्गाचा भाग असलेल्या पुरुषांपेक्षा गल्ली-कोपऱ्यावर उभ्या असलेल्या मुलग्यांसोबत याविषयी काम करणे जास्त आवश्यक व आव्हानात्मक आहे, मात्र ते शक्य आहे. या मुलांचा मुलींकडे पाहण्याचा दृष्टिकोन संपूर्णपणे असमानतेचा असल्याचे तर लक्षात आलेच मात्र तो भाषेत किंवा कृतीत लपवण्याची लबाडी ते करत नाहीत हेदेखील लक्षात आले. अर्थात आपण सारेच समानतेचा अथवा असमानतेचा विचार घेऊन जन्माला येत नाही तर तसा तो सामाजिकीकरणातून घडविला जातो हे वास्तव आहे. मात्र असमानतेचा दृष्टिकोन लपवून आपण किती समानतावादी आहोत असा आभास निर्माण करण्यामागे जात-वर्ग प्रभाव असल्याचे मात्र दिसून येते. म्हणूनच समाजातील वरच्या समजल्या जाणाऱ्या जात व वर्गामध्ये कुटुंबातील स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेबद्दल काहीही न बोलण्याची संस्कृती रुजली आहे. आणि एकदा आभास निर्माण करून घेतला की मग आपल्याला अवघड वाटणाऱ्या आणि अवघडायला लावणाऱ्या मुद्यांना सामोरेच जावे लागत नाही. जात या मुद्यावरही 'आम्ही जात मानत नाही' असा आभास आपल्यापैकी अनेकांनी तयार करून घेतलेला असतो. पण जरा खरवडले तर मनातील जात किंवा तिचे अंश आपल्या खान-पान-राहणीमान-संस्कृतीमध्ये किंवा वागण्या-बोलण्यामध्ये आढळतातच आणि म्हणून मग जातीअंताचे खरे काम मागेच राहते. स्त्री-पुरुष समानतेचेदेखील बरेचसे असेच झाले आहे.

'सम्यक' च्या महाविद्यालयातील युवकांसोबतच्या कामात आम्ही 'सहज पकडीत येणारे' या गटातील युवकांसोबत काम करणे शक्यतो टाळतो. म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस), कला मंडळ, वाङ्मय मंडळ, काव्य मंडळ यातील युवक समानतेच्या कार्यक्रमांसाठी सहज पकडीत येतात. कारण ते मुळातच एका वर्गामधून आलेले व तुलनेने जास्त अनुभवी असल्याने या अवकाशामध्ये सामील झालेले असतात. या गटापेक्षा 'सहज पकडीत न येणाऱ्या' युवकांसोबत काम करण्याकडे आमचा कल जास्त राहिला आहे. ही 'अवघड' समजली जाणारी मुले कॉलेज कॅन्टीन, कट्टे, मैदानावरच्या झाडाखाली किंवा पार्किंगमध्ये तासन्तास नुसतीच गप्पा मारत, एकमेकांना टाळ्या देत आणि मोठमोठ्याने हसत उभी अथवा गाड्यांवर बसलेली असतात. थोडीशी भडक जीन्स आणि त्यावर एकदम लेटेस्ट फॅशनचा टी-शर्ट, केसांचे स्पाईक्स, हातात एखादा 'दागिना' आणि पाठीवर लटकवण्याची सॅक असा एकूण पेहराव असतो. या मुलग्यांसोबत साधारण यासारख्याच पेहरावात दोन-चार मुलीदेखील या ग्रूपचा भाग असतात. हसण्यामध्ये आणि दंगामस्तीमध्ये या मुलीपण तितक्याच सामील असतात. या मुलांना ना कोणी कला मंडळात घेते, ना वाङ्मय मंडळात घेते, ना काव्यमंचात बोलवते. मुळातच यांना 'भाईगिरी' करणारे, वाया गेलेले' अशी लेबले लावलेली असतात. यातील बहुतेक मुले पुण्याच्या खडकमाळ, शिंदे आळी, शिवाजीनगर गावठाण, गोखलेनगर, वडारवस्ती, बिबवेवाडी कट्टा, अप्पर इंदिरा नगर, पर्वती पायथा, लक्ष्मीनगर अशा भागातून आलेली असतात. ज्यांना पुण्याच्या भौगोलिक व आर्थिक स्वरूपाचा अंदाज आहे त्यांना ही मुले कुठल्या सामाजिक, आर्थिक गटामधून येतात याचा अंदाज यावा. याच गटामध्ये काही वेळेला ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पुण्यात आलेली 'पुण्याने' नाकारलेली मुलेही असतात. मीदेखील अशाच एका गटाचा भाग होतो. या अशा गटातील मुलांच्या प्रत्येकाच्या अशा वेगळ्या कहाण्या असतात. गरिबी, तंगी, वस्त्यांमधील किंवा चाळींमधील वातावरण आणि त्याचसोबत वेगाने बदलणाऱ्या आर्थिक जगाने निर्माण केलेल्या बाजारकेंद्री आयुष्याचे प्रचंड आकर्षण! त्यामुळे परिस्थिती आणि झगमगाटाचे जग यामध्ये प्रचंड ओढाताणीचे आणि भागवाभागवीचे आयुष्य ही मुले जगतात. बाजारातील लेटेस्ट ब्रॅण्डचे बूट, कपडे, घड्याळ, बॅग वापरली तरच आपण खरे पुरुष किंवा मर्द अशी समजही तयार झालेली असते. ब्रॅण्डेड वस्तू परवडत नाहीत म्हणून मग डुप्लिकेट ब्रॅण्ड्स वापरून आभासी प्रदर्शन मांडले जाते. आपण कुणीतरी आहोत, आपले इथे अस्तित्व आहे असे ठासून सांगण्यासाठी मग काही धाडसी प्रकार, भांडणे, धोके पत्करणे, विरोध करणे, मुलींना त्रास देणे असले प्रकार सुरू होतात. नाकारलेपणाची भावना दाबून, आपले अस्तित्व दाखवून देण्यासाठी व आपण गणतीमध्ये राहावे म्हणून यातील बहुतेक मुलगे पुरुषी आविष्कार करत राहतात. आणि म्हणूनच आम्ही या गटासोबत काम करण्याचे ठरविले.

ही मुले कुठून येतात, त्यांच्या काय कहाण्या आहेत, मुलींकडे ही मुले काय दृष्टीने पाहतात व पुरुषपण सिद्ध करण्यासाठी ती काय काय धोके पत्करतात याचा अभ्यास करणे आणि त्यांच्यामध्ये लिंगभावविषयक संवेदना वाढून त्यांची स्वतःच्या आयुष्यातील धोके स्वीकारण्याची वृत्ती कमी होणे व मुलींविषयीची वर्तणूक बदलणे या उद्देशाने हे काम सुरू केले गेले. यासाठी लिंगभावविषयक, पुरुषत्वविषयक कार्यशाळा घेणे, या कार्यशाळांचे अहवाल तयार करणे असले एनजीओ प्रकारचे कार्यक्रम आम्ही आखले होते. पुण्यातल्या मध्यवर्ती भागातील तीन महाविद्यालयांतील वाहनतळे, कॅन्टीन, कट्टे येथे भेटी देऊन मुलांच्या गटांचे निरीक्षण करणे, मुलांचे वर्तन न्याहाळणे, एकूण माहोल अनुभवणे, भाषा ऐकणे व शिकणे असे काम मी सुरू केले.

सकाळच्या ठरलेल्या वेळी ठरलेली मुले घोळका करून जमतात. आपापले 'अड्डे' सांभाळतात. दंगा मस्ती चालू असतेच. क्वचित प्रसंगी मुलींना त्रास देणे चालू असते, अशी निरीक्षणे मी नोंदवत गेलो. काही गट नजरेत आलेच होते. त्या प्रत्येक गटाला त्यांच्या अड्ड्यावर गाठून त्यांना माझ्याबद्दल, कामाबद्दल सांगितले व एका मीटिंगसाठी या असे निमंत्रण दिले. नक्की भाऊ, एकदम डन, आपण येणार, पक्का, अशी आश्वासने मला मिळत गेली. पण मीटिंगच्या दिवशी, वेळी व जागी कुणीही फिरकले नाही. बरेच प्रयत्न झाल्यानंतर लक्षात आले की तीन महाविद्यालयातील भाईंना जबरदस्तीने एकत्र करणे शक्य नाही. त्यापेक्षा एकाच महाविद्यालयात

हा प्रयोग करावा. म्हणून मग एकाच महाविद्यालयात वावर वाढवला. हळूहळू हाय-हॅलो वाढले व या प्रकरणाविषयी माहिती एका गटाला समजवण्यात यश आले. पण या सगळ्या महिन्या-दोन महिन्यांच्या कालावधीत काही गोष्टी माझ्या लक्षात आल्या. ही मुले सतत व नेहमी मुलींविषयी अनादराची भावना बाळगून असतात, मुलींना त्रास देण्यासाठीच गेटवर उभी असतात असा माझा जो गैरसमज होता तो दूर झाला. मग ही मुले कशात मग्न होती? ''काय करता रे तासन्‌तास गेटवर?'' या प्रश्नाचे उत्तर अचंबित करणारे होते. मुले म्हणाली, ''आम्ही नवनवीन मॉडेल्सच्या टू-व्हीलर्स बघतो, रस्त्याने जाणाऱ्या भारी भारी गाड्या पाहतो, मुलींकडे पण पाहतो.'' पण गंमत अशी की मुलींकडे पाहून त्यांची छेड काढणे हे त्यांच्या प्राधान्ययादीतील काम नव्हते. खरे तर या मुलांपेक्षाही इतर मध्यमवयीन, पोट सुटलेले पुरुष मुलींना जास्त न्याहाळत उभे असतात, असे माझे कॉलेजच्या गेटवरचे निरीक्षण आहे. मुलींकडे का पाहता याचे उत्तर मात्र 'असंच' यापुढे गेले नाही. पण या प्राथमिक गप्पाटप्पांमधून आमच्यातला संवाद वाढू लागला व मलाही त्यांना समजून घेण्याची संधी मिळत गेली.

लिंगभाव, पुरुषत्व, हिंसा याबाबत कार्यशाळेसाठी मात्र मुले तयार नव्हती. त्यांना काय करायला आवडेल याची चर्चा झाली तेव्हा कळले की कोरल ड्रॉ नावाचे डिझाईनचे सॉफ्टवेअर शिकण्यात त्यांना जास्त रस होता. मग विचार आला की मुलांना कोरल ड्रॉ चे मूलभूत धडे द्यायचे. एका व्यावसायिक प्रशिक्षकाची मदत घेतली. त्यांचे प्रशिक्षण सुरू झाले. पण डिझाईन काय करायचे हे ठरवताना मात्र त्यांना विषयाबाबत तडजोड करावी लागली. पुरुषत्वाची आपली समज व त्यामुळे आपण घेत असलेले धोके असा व्यापक विषय ठरला. मग या विषयावर पोस्टर बनवायचे तर याविषयी समज पण वाढली पाहिजे म्हणून या विषयावर कार्यशाळेसाठी मुले तयार झाली. पुढे त्यांनी पुरुषत्व आणि धोके स्वीकारणे या विषयावर एक प्रभावी पोस्टर तयार केले.

मुलगे कोणकोणते धोके पत्करतात याविषयीची एक भलीमोठी यादी या कार्यशाळेत तयार झाली. त्यांची वर्गवारी आम्ही कायदेशीर धोके, आर्थिक धोके, आरोग्याचे धोके, मानसिक व भावनिक धोके आणि नातेसंबंधाबाबतीत संभवणारे धोके अशी केली. याविषयीच्या चर्चेमध्ये मैत्रिणीबरोबरचे नाते, एकूणच मुलींविषयी असलेला दृष्टिकोन, तो तसा तयार होण्याची कारणे याबाबत सविस्तर चर्चा झाली. मुलींच्या कपड्यांविषयी अगदी सर्वमान्य असतात तसेच गैरसमज होते की मुली कमी कपडे घालतात म्हणूनच समाज त्यांच्याकडे 'वाईट' नजरेने पाहतो. या सगळ्या विश्लेषणातही 'इतर मुलगे वाईट नजरेने पाहतात, आम्ही नाही' असा भाव सुरुवातीला होता. त्यांच्या ग्रूपमधील मुली अशाच आधुनिक वेशात असत मात्र ही मुले त्यांच्यावर कधीच टीकाटिप्पणी करताना आढळली नाहीत. मल्लिका शेरावत ला 'आयटम' म्हणणारी मुले स्वतःच्या मैत्रिणींबाबत मात्र प्रचंड आदरभाव बाळगून असत. शहरी,




उच्चवर्णीय व श्रीमंत दिसणाऱ्या मुलींकडे मात्र 'अपने टाईप की नहीं' असाही भाव बाळगून असत. किंबहुना ते त्यांची आपापसात चेष्टा करत असत. 'तुपकट', 'घी की डब्बी', 'सुरळीची वडी', 'आळूचं फदफदं' ही त्यांची शहरी मुलींसाठी नोंदवलेली शेलकी विशेषणे. अर्थात या सगळ्या दृष्टिकोनांवर सुमारे वर्षभर काम करावे लागले. सगळेच बदलले किंवा संपूर्ण बदल झाले असे मात्र नाही. पण जे बदलले किंवा जितके बदलले त्याचा आवाका मात्र खूपच विलक्षण होता. याच मुलांनी त्या वर्षी महिला हिंसाचार विरोधी पंधरवड्यात जोमाने काम केले. यातील काहीजण पुढे स्त्री-अभ्यास केंद्राच्या प्रशिक्षणाला गेले तर काही काहींनी समाजकार्य शिक्षणासाठी प्रवेश घेतला.

बदल शक्य आहे. सर्वजण बदलू शकतात. अवघड आणि टाकाऊ समजली जाणारी मुलेही बदलू शकतात. मुलींकडे, स्त्रियांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन तयार होण्यामागची सामाजिक, आर्थिक कारणे समजून घेऊन संयमाने प्रयत्न केले तर त्यांचे पुरुषी दृष्टिकोन बदलू शकतात. ते कदाचित परिवर्तनाची व पुरोगामी भाषा बोलणारे पोपट होणार नाहीत, मात्र जितके बदलतील तितके प्रामाणिकपणे बदलतील असा विश्वास या प्रवासात निर्माण झाला. स्त्रियांकडे, मुलींकडे पाहण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन काय असतो याचे विश्लेषण करताना व तो बदलण्याचा प्रयत्न करताना जात-वर्ग-स्थान या घटकांची भूमिका महत्त्वाची ठरते हे मात्र आपण समजून घेतले पाहिजे.

**आनंद पवार**
anandpawar@gmail.com
9850516237

# मुलींना शिकवून तर पाहा! - सिस्टर डॅफने सिक्वेरा



पुण्याच्या कर्वे इन्स्टिट्यूटमधून समाजकार्यामध्ये एम फिल केल्यानंतर सिस्टर डॅफने सिक्वेरा यांनी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे 'आशांकुर' संस्थेच्या माध्यमातून १० वर्षे महिला सबलीकरणाचे काम केले. सध्या त्या महिला विकास केंद्र, तोरपा, झारखंड येथे ग्रामीण महिलांच्या विकासासाठी कार्यरत आहेत. महिला सबलीकरणाच्या मुद्द्यांवर अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादरीकरणे व चर्चांच्या रूपात त्यांचा सहभाग राहिला आहे.

लिली ही रनिया तालुक्यातील एक २६ वर्षांची आदिवासी स्त्री. झारखंड राज्यातील सर्वात मागासलेल्या, ९०% आदिवासी लोकसंख्या असणाऱ्या खूँटी जिल्ह्यातील ओरिसाच्या सीमेलगतचा हा तालुका. आपल्या ३ लहान मुलांबरोबर ती १२ जणांच्या एकत्र कुटुंबात राहते. या भागातील बहुसंख्य कुटुंबे एकत्रच असतात.

लिलीचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी केवळ शेतीवर अवलंबून आहे. त्यांच्याकडे काही शेळ्या आहेत. याशिवाय जंगलातून फळे, कंद, आळंब्या (मश्रूम्स), चारोळ्या, लाकूडफाटा गोळा करून आठवडे बाजारात विकून थोडीफार मिळकत होते. लिलीचे गाव डोंगराच्या कुशीत वसले आहे. तेथे वाहनाची कसलीच सोय नाही. रस्ते तर नुसते नावालाच. बाजारात जायचे ते पायीच.

ख्रिसमसच्या आठवडाभर आधीची गोष्ट. लिली आपली एक शेळी आठवड्याच्या बाजारला विकायला घेऊन चालली होती. जवळजवळ दीड वर्ष तिने ही शेळी सांभाळली होती. या गुटगुटीत शेळीला चांगली किंमत मिळेल अशी तिची खात्री होती. ख्रिसमसच्या सणासाठी तिला बाजार आणायचा होता.

घरून बाजारात जायला तिला ६ किलोमीटर जंगलचा रस्ता पार करायला हवा होता. आमच्या भागातील रिवाजाप्रमाणे गरीब आदिवासीने आणलेले काहीबाही हडप करण्यासाठी रस्त्याच्या कडेला माणसे उभीच असतात. बाजार साधारण १ किलोमीटर राहिलेला असताना एका माणसाने लिलीला थांबवले. जबरदस्तीने तिच्याकडून शेळी हिसकावून घेतली आणि ५०० रुपयाची नोट हातात कोंबली. लिलीने जिवाच्या आकांताने शेळी घट्ट धरून ठेवली आणि भेदरलेल्या आवाजात या सौद्याला नकार देऊ लागली. ''मग किती पाहिजेत तुला? ५०० च्या वर एक रुपयाही किंमत नाही हिची,'' तो माणूस लिलीवर मोठ्याने ओरडत म्हणाला. एकीकडे तिच्याशी हुज्जत घालत तो माणूस दहाची एक-एक नोट तिच्या हातात कोंबत होता. शेवटी त्याने तिच्या हातातून ती शेळी घेतली आणि तो निघून गेला. आपल्याला खूप पैसे मिळाले या आनंदात लिली घरी गेली. घरातल्या पुरुषांना जेव्हा तिने पैसे दिले तेव्हा केवळ ५८० रुपयांना शेळी विकली म्हणून घरच्यांनी तिची चांगलीच खरडपट्टी काढली. त्या शेळीचे कमीत कमी २००० रुपये तरी मिळायला हवे होते. ५८० रुपयात तर तिचे खाणे पण निघत नव्हते.



या प्रकारानंतर काही दिवसांनी लिलीच्या गावात आमची सभा होती. तिच्या घरासमोरच सभा झाली. सभेनंतर गप्पा मारीत बसलेलो असताना तिच्या नवऱ्याने ही सगळी गोष्ट आम्हाला सांगितली. मी त्याला विचारले, ''त्या शेळीसाठी ५८० रुपये ही फारच कमी किंमत आहे हे तुला कसे कळले?'' ''मी १० वी झालोय. लिली कुठे शाळेत गेली होती?'' तो म्हणाला. मी पुढे विचारले, ''खूपशा नोटा म्हणजे खूप पैसे असे लिलीला वाटले ही चूक कोणाची?''

ग्रामीण, आदिवासी भागात

बाया-मुलींची अशी अनेकदा फसवणूक होते. आधी शेळीच्या सौद्यात लिलीची फसवणूक झाली आणि नंतर घरच्या शिकलेल्या माणसांनी तिचा पाणउतारा केला. ती निरक्षर आहे म्हणून तिचा अपमान केला.

आम्ही गावागावातून दर महिन्याला बायकांच्या सभा घेतो. पुढच्या सभेला मी आपला अनुभव सांगण्यासाठी लिलीला पुढे बोलावले. तिचा अनुभव ऐकल्यावर इतर अनेक बायकांनी अशा प्रकारे फसवले गेल्याचे आपापले अनुभव सांगितले. जवळजवळ प्रत्येकीने एक तरी असा अनुभव सांगितलाच. अनेकींनी असेही बोलून दाखवले की कुटुंबात कोणताही महत्त्वाचा निर्णय घ्यायचा असेल तर तू अडाणी आहेस, तुला काय कळतं म्हणून त्यांना कोणी काही विचारत नाही. एक म्हटली की बायका अडाणीच असतात आणि त्यांना पुरुषांइतके समजत नाही. त्यावर दुसरी एकजण म्हणाली, बायकांना शिकवण्याचा कुणी विचार तरी करते का घरी? ती पुढे म्हणाली की तिला शिकण्यात खूप रस होता. तिला भावाबरोबर शाळेत जायचे होते. पण धाकट्या भावंडांना सांभाळण्यासाठी, स्वयंपाक करण्यासाठी आणि शेतीत कामे करण्यासाठी तिची घरीच गरज आहे असे घरच्यांनी सांगितले.

फार उशीर झालेला नसून त्यांना शिकायची इच्छा असेल तर ते अजूनही शक्य आहे असा दिलासा दिल्यावर सर्व जणींनी एका सुरात 'हो' म्हणून सांगितले. आम्ही लगेचच त्यांच्या गावात व्यावहारिक साक्षरता कार्यक्रमाची सुरुवात केली. दररोज दीड तास याप्रमाणे आठवड्याचे ६ दिवस तास होऊ लागले. महिलांना आम्ही अक्षर आणि अंक ओळख करून दिली. नोटा कशा ओळखायच्या, बँकेच्या पासबुकातील नोंदी कशा वाचायच्या आणि शासकीय कार्यालयाला पत्र कसे लिहायचे हे आम्ही त्यांना शिकविले. महिला सक्षमीकरणाचे धडेही आम्ही घेतले. नऊ महिन्यांतच त्या लिहायला-वाचायला शिकल्या आणि आता आपल्या बचत गटाचे कामकाज त्या स्वतः पाहू लागल्या आहेत.

नुकतीच घडलेली एक गोष्ट. दोन महिने बँकेच्या खात्यावर जमा केलेली बचत गटाची रक्कम खात्याच्या पासबुकात दिसत नव्हती. महिलांनी बँकेत जाऊन तक्रार केली. पाच हेलपाटे घातल्यावर कुठे त्यांचे काम झाले आणि रक्कम त्यांच्या खात्याला टाकली गेली. या प्रसंगानंतर त्या सर्व महिलांनी ठामपणे सांगितले की जर त्या लिहित्या-वाचत्या नसत्या तर बँकेने त्यांना फसवून त्यांचे पैसे हडप केले असते. या प्रकरणानंतर महिलांचा आत्मविश्वास खूपच वाढला. त्या आता ग्रामसभांमध्ये भाग घेऊ लागल्या आहेत. काही महत्त्वाच्या बाबींची चर्चा करण्यासाठी त्या सरपंचांना मीटिंग बोलवायला भाग पाडतात.

या गटाने आजूबाजूच्या गावातील महिला गटांनाही प्रेरणा दिली. वेगवेगळ्या गावांतून साक्षरता वर्गांची मागणी येऊ लागली आणि गेल्या ३ वर्षांत ६०० महिला सुशिक्षित झाल्या. महिलांच्या शिक्षणातून झालेला कुटुंबाचा व गावाचा झालेला विकास खरोखरच फार आनंद देणारा आहे. यातून लोकांचे आरोग्य, मिळकत आणि समाजातील लोकांचे एकमेकाशी असणारे संबंध सुधारले आहेत. गावातील प्रत्येक मूल आज शाळेत जात आहे.

शिक्षण सर्वांसाठीच महत्त्वाचे आहे. परंतु बायका आणि मुलींसाठी ते विशेषच महत्त्वाचे आहे. आयुष्यातील इतर संधींपर्यंत पोहोचण्याचा तो एक मार्ग आहे हे खरे. पण बाईचे शिक्षण केवळ एवढ्यासाठीच महत्त्वाचे नाही. वरच्या गोष्टीतून लक्षात येईल की बाईचे शिक्षण हे घर, समाज आणि पुढील पिढ्यांपर्यंत पाझरते. आपल्याला सर्वांना माहीत आहे की आईच मुलांना वाढवते. तीच घर सांभाळते. हातात जे काही चार टके पडतील त्यात तीच सर्व भागवते. शिकलेली स्त्री आरोग्याचे महत्त्व जाणते आणि स्वतःसाठी आणि आपल्या मुलांसाठी आरोग्यसेवांपर्यंत कसे पोहचायचे ते तिला माहीत असते. शिक्षण मुलींना आणि महिलांना आत्मविश्वास देते आणि त्यांच्या हक्कांची नुसती जाणीवच करून देत नाही तर ते मिळविण्याचे धैर्यही देते. घरी येणाऱ्या उत्पन्नातील जास्तीत जास्त हिस्सा आपल्या मुलांच्या वाट्याला कसा जाईल हे त्या बघू शकतात. त्यामुळे मुलांचे पोषण आणि शिक्षण दोन्हीही सुधारण्यास मोठी मदत होते.

पण आपल्या व्यवस्थेत स्त्रियांना स्थान आणि मान कुठे आहे? त्यांचे म्हणणे, मत विचारात घेतले जात नाही. त्यांना गृहीत धरले जाते, शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. लिलीची गोष्ट खूप काही सांगून जाते. समाजाचे भले होण्यासाठी त्यातल्या सर्व घटकांचा विकास होणे गरजेचे आहे. स्त्री हा समाजाचा अर्धा घटक असा वंचित ठेवून कुठलाच विकास शक्य नाही. लिलीची गोष्ट पाहून म्हणावेसे वाटते की स्त्रियांना गृहीत धरू नका आणि शिक्षणालाही.

**सिस्टर डॅफने सिक्वेरा**
dsequeira@rediffmail.com
08809854359

व्हॅटिकन सिटी, रोम येथे ८ मार्च, २०१४ रोजी झालेल्या 'व्हॉइसेस ऑफ फेथ' या कार्यक्रमात सिस्टर सिक्वेरा यांनी केलेल्या 'डेअर टू एज्युकेट अ गर्ल' या भाषणाचा हा संपादित अंश आहे. मराठी रूपांतर: मंजिरी निंबकर

# नकुसा ते लाडली ते... ?

– गीताली वि. मं.



गीताली वि. मं. या रसायनशास्त्राच्या निवृत्त प्राध्यापिका. जीवनसंस्था, नारी समता मंच, निगराणी महिला बालक विकास संस्था, विमेन्स नेटवर्क, शाश्वत आदी संस्थांच्या त्या संस्थापक सदस्य व पदाधिकारी आहेत. 'स्त्री प्रश्न सोडवताना', 'प्रश्न पुरुष भानाचे', 'कथा गौरीची', 'स्वातंत्र्यपूर्व संध्या' इत्यादी पुस्तकांच्या त्या संपादक सदस्य तर 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या व 'पुरुष उवाच' दिवाळी अंकाच्या संपादक आहेत. पालकनितीच्या विश्वस्त व संपादक म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले आहे.

साधारणपणे चाळीस-बेचाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट. मला दिवस गेले होते. घरातल्या वडीलधाऱ्या मंडळींना सणासुदीला नमस्कार केला की झाडून सर्व ज्येष्ठ स्त्री-पुरुष 'मुलगा होऊ दे' असा तोंड भरून आशीर्वाद देत. तो ऐकून आम्ही दोघं नवरा-बायको म्हणायचो, ''पण आम्हाला मुलगीच हवीय!'' त्यामुळे माझे वडील एकदा चिडून म्हणाले, ''तुला चांगल्या ७-८ मुलीच व्हायला पाहिजेत.'' त्यावर मी म्हटलं, ''सगळ्या म्हणजे जास्तीत जास्त दोनच! आणि त्या दोघींचंही स्वागतच आहे.'' सगळी माणसं सारखं काय 'मुलगा हवा मुलगा हवा' म्हणतात, याचा मला तेव्हा राग यायचा. आम्ही तिघी बहिणी आणि एक भाऊ. मी अगदी लहानपणापासूनच बंडखोर. आई जेव्हा भावाची बाजू घेत पक्षपातीपणे वागायची तेव्हा मी तिच्याशी हिरीरीने भांडायचे, विरोध करायचे. माझ्या बहिणींनी मात्र ते मान्य करूनच टाकलं होतं.

मला दुसरीही मुलगी झाली तेव्हा भेटायला येणारे अगदी सुतकी चेहरे करून माझं सांत्वन करायचा प्रयत्न करायचे, तेव्हा मला राग येण्याबरोबर गंमतही वाटायची. मी त्यांना शांतपणे सांगायचे, ''माझी दुसरी मुलगी हाती-पायी धड आणि खूप गोऽऽऽड आहे. मला आनंद झाला आहे. प्लीज तुम्ही दुःख करू नका.'' एरवी फार समारंभप्रिय नसणाऱ्या आम्ही या दुसऱ्या लेकीचा जन्मोत्सव मात्र थाटात केला. कारण आम्हाला आनंद झालाय हे समाजमान्य पद्धतीनं दाखवण्याची गरज आम्हाला तेव्हा वाटली.

'मुलगी वाचवा, मुलगी शिकवा' असं म्हणत बालिकोत्सव करण्याची गरज  सरकार, सामाजिक संस्था जीव तोडून सांगताहेत. ११ ऑक्टोबर हा दिवस युनोनं बालिका दिन म्हणून जाहीर केला आहे. तसंच २४ जानेवारी हा दिवस भारतीय बालिका दिन म्हणून साजरा होतो. २०१३ हे Save the girl child म्हणून घोषित झालं. मुलींना जन्मापूर्वीच संपवण्याविरुद्ध स्त्री-चळवळ संघर्ष करते आहे. जगभर मुलींच्या संरक्षणासाठी, त्यांच्या बालपणी होणाऱ्या विवाहाविरुद्ध, त्यांच्या शिक्षणासाठी अनेक कायदे आणि विविध उपक्रम आहेत. मुलींचे हक्क आणि त्यांच्यासमोर असणारी आव्हानं याविषयी जागरूकता वाढते आहे. पण समाजमन अजूनही पुरुषप्रधान व्यवस्थेत रमलेलं आहे.

एकोणीसशे सत्तरच्या दशकात आमच्या घरी धुणी-भांडी करणाऱ्या, स्वयंपाक करणाऱ्या, मुलींना सांभाळायला येणाऱ्या सहकारी स्त्रियांना पाच-सहा मुली असणं किंवा पाच-सहा बहिणी असणं खूप कॉमन होतं. पहिला मुलगा असला तरी अजून एक मुलगा हवा म्हणून मध्ये पाच-पाच मुलींची लाईन असे. 'वंशाचा दिवा' ही संकल्पना समाजमनात खूप खोल खोल रुतलेली आहे. वंशाचा दिवा हवा या हव्यासापोटी पूर्वी कुटुंब नियोजनाचे पर्याय सहज उपलब्ध नव्हते तेव्हा नकोशा नवजात मुलींना दुधात बुडवत, गोधडी अथवा उशी तोंडावर दाबून मारत, आईच्या दुधाबरोबर अफू चारत, खड्डयात गाडत, उकिरड्यावर फेकून देत आणि काय काय करत! मुलगी एवढी नकोशी का? असा मुली मारणारा समाज का घडला? असे प्रश्न मनाला डसत राहतात.

बऱ्याच वर्षांपूर्वी 'नकुसा' हा युनिसेफनं तयार केलेला लघुपट पहिला. आधी नकुसा हा शब्द कानाला गोड लागला होता, पण त्याचा अर्थ 'नकोशी' आहे हे कळल्यावर काळजाचा ठोका चुकला. मुलीचं नाव म्हणजे तिची ओळखच नकोशी अशी असू शकते!? या वास्तव दर्शनानं अंतर्बाह्य हादरले. नकुसा बघताना घरातल्या मुलींचं झाडलोट करणं, पाणी भरणं, धाकट्या भावंडाना सांभाळणं, गरज पडली तर शेतात काम करणं असं न संपणारं कामाचं अव्याहत चक्र मनात घर करून राहिलं. शहरी झोपडवस्तीतसुद्धा थोडा तपशीलात फरक असला तरी चित्र साधारण असंच. इतकी कामं करूनही मुलींनी 'नकोशा' म्हणवून घ्यायचं! मुलींचं इतकं ओझं घरादाराला, समाजाला का वाटतं? मुलींच्या या नकोशापणाची मुळं फार  दूरवर खोल खोल रुजलेली आहेत. आणि ती राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आदी अंगांनी एकमेकांत गुंतलेली आहेत.

'नारी समता मंच' मध्ये काम करताना स्त्रियांच्या यातना, त्यांना मिळणारी अपमानास्पद, निर्घृण वागणूक, त्यांचं होणारं शोषण आणि दमन खूप जवळून दिसत होतं. स्त्री चळवळीनं पुरुषप्रधान व्यवस्थेचं व्यवच्छेदक लक्षण म्हणजे तिचं दुय्यमत्व हे लक्षात आणून दिलं. स्त्रीच्या दुय्यमत्वाचे अनेक आविष्कार सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आदी स्वरूपांत पदोपदी कसे दिसून येतात याचं भान आणून देण्याचं काम मंच गेली तीस-पस्तीस वर्षे करत आहे. स्त्री ही विकृती नसून प्रकृती आहे, ती पुरुषांपासून वेगळी आहे पण दुय्यम नाही, असं आजही सांगावं लागतं ही शोकांतिका आहे.

१९८० च्या दशकात इतर संघटनांबरोबर मंचानं पुण्यात

गर्भजल लिंग परीक्षा करून स्त्री-गर्भ असला तर गर्भपात करणाऱ्या डॉक्टरांच्या दवाखान्यांसमोर निदर्शनं केली, मोर्चे काढले. दोषी डॉक्टरांवर कडक कारवाई करण्याच्या आणि गर्भलिंग निदान करणाऱ्या सोनोग्राफी मशीनला सील ठोकण्याच्या मागण्या करण्यात आल्या. १९८८ साली महाराष्ट्रात व १९९४ मध्ये भारतात प्रसूतीपूर्व गर्भलिंग चाचणीच्या विरोधात कायदा झाला आहे. तरीही ज्या प्रमाणात आणि संख्येनं आजही गर्भलिंग निदान करून स्त्री-गर्भ पाडून टाकले जातात त्यातून समाजातील घातक रूढी फक्त कायदा करून संपत नाहीत हेच पुनः पुन्हा अधोरेखित होत आहे. तंत्रज्ञान हे दुधारी शस्त्र आहे. ते कायद्यापुढं दोन पावलं जातं आणि अनेकदा कायदा निकामी करून टाकतं. तंत्रज्ञान कितीही पुढं गेलं तरी समाजमन जर खऱ्या अर्थानं प्रगत झालं नाही तर तंत्रज्ञानाचा वापर समाजघातक गोष्टी करू शकतो याचं हे जळजळीत उदाहरण आहे.

गर्भलिंग निदान करून स्त्री-गर्भ पाडणं यामागची कारणं मिश्र आणि गुंतागुंतीची आहेत. मुलींनी आर्थिकदृष्या स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी, स्वतःच्या विकासासाठी शिक्षण घेणं गरजेचं आहे. परंतु आजही अनेक ठिकाणी मुलींच्या शिक्षणास दुय्यम महत्त्व दिलं जातं. ग्रामीण भागात संस्कृती, दारिद्र्य, अज्ञान, घरकाम, आजारपण, पालकांची व्यसनाधीनता अशा अनेक कारणांनी मुलींची शिक्षणातून गळती होते. एकतर्फी आकर्षण असणाऱ्या मुलांना मैत्रीला नकार दिल्यास मुलींच्या हत्या अधूनमधून घडतच असतात. यातून असुरक्षित वाटून मुलींना घरी बसवलं जातं आणि त्यांचं शिक्षण बंद होतं. हे म्हणजे कलाकलानं मुलींची हत्या करणंच आहे.

जीवघेण्या स्पर्धेच्या युगात, कंबरडं मोडून टाकणाऱ्या महागाईच्या भस्मासुराचा मुकाबला करायचा तर कुटुंब लहानच हवं. पण 'हम दो हमारा एक' किंवा 'दो बस्स' यात जर मुलगा झालाच नाही तर वंशच खुंटणार! वंश म्हणजे नवऱ्याचा वंश आणि चालवणार पण मुलगाच! म्हणून मग मुलगाच देणारी बाई हवी. मुलगा न झाल्यास बाईचा शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक अशा सर्व पातळ्यांवर होणारा छळ बघून, मुलींची होणारी आबाळ, त्यांची घुसमट, कुचंबणा पाहून बाईलाही वाटतं, नकोच ती पीडा! त्यापेक्षा गर्भलिंग चिकित्सा करून मुलगी असली तर गर्भ पाडून टाकावा हे उत्तम! एकूणच स्वतःपुरतं पाहण्याची वृत्ती दिवसेंदिवस वाढते आहे. त्यामुळे दुसऱ्यांच्या घरात होणारा स्त्रियांचा छळ, बलात्कार, हिंसा यांकडे दुर्लक्ष केलं जातं. मग स्वतःवर ती वेळ येते तेव्हा मदतीला कुणी येत नाही. सर्वांच्या घरांची आणि मनांची दारं बंद असतात. आणि... स्त्रियांवरील, मुलींवरील अत्याचार-हिंसाचार वाढत जातात.

आजही लाखो स्त्री-गर्भ लिंगसापेक्ष गर्भपातामुळे जीवनाला मुकत आहेत. गर्भातली मुलगी आईला पत्र लिहून 'मला जगू दे, वाढू दे,' असं म्हणते अशा आशयाच्या मन हेलावून टाकणाऱ्या कविता प्रसिद्ध होत असतात. स्त्रीला जन्मण्याचा हक्क नाकारणं ही मानवी हक्कांची पायमल्ली आहे. जगाचं अर्ध अस्तित्व नाकारणं, अवघ्या आयुष्याचं अर्धुक बनवणं आहे. हे समाजस्वास्थ्यासाठी घातक आहे. शिक्षित वर्गालासुद्धा वाटतं की स्त्रिया जर 'दुर्मिळ' झाल्या तर त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार थांबतील कारण त्यांची 'किंमत' वधारेल. पण हे खरं नाही, कारण व्यवस्था अजूनही पुरुषप्रधानच आहे, असं स्त्री-चळवळ बजावते आहे.

समाजमनात म्हणजे स्त्री-पुरुष, एल जी बी टी, अशा सर्व सर्व समाजघटकांमध्ये खोलवर जाणीव-नेणीवेतही पुरुषप्रधानता ठासून भरली आहे. लिंग जन्मानं मिळतं पण लिंगभाव ऐतिहासिक पार्श्वभूमीवर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक माहोलामध्ये घडवला जातो, जोपासला जातो. लिंगभेदावर आधारित समाजरचना म्हणजे लिंगभाव. स्त्रियांचे प्रश्न आणि समस्या या वेगळ्या गोष्टी आहेत. राज्य, अर्थ, धर्म,विधी, कुटुंब, संस्कृती, शिक्षण या सर्व संरचनांमधून स्त्रीप्रश्न घडतो, म्हणून स्त्रियांच्या व्यक्तिगत समस्यांविरुद्ध लढत असतानाच व्यवस्थात्मक संघर्षाचा विचार करणे अपरिहार्य आहे. मातृत्वाचा गौरव, दैवीकरण यातून स्त्रियांचं माणूसपण हिरावून घेतलं जातं. स्त्रियांना माणूसपण मिळावं म्हणूनच स्त्रीवादी चळवळ काम करते. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीप्रश्नांची राजकीय जाणीव. स्त्रीवादाचं व्यवहारिक रूप म्हणजे लिंगभावासंबंधी चिकित्सक अंगानं प्रश्न विचारणं, राजकीय रचना आणि सत्तासंबंध ओळखणं. स्त्रीचळवळीची घोषणा होती- जे जे व्यक्तिगत ते ते राजकीयच! उदा. नवरा बायकोच्या समस्येत दोघांच्या केवळ वागण्याची, स्वभावाची चिकित्सा पुरेशी नाही. तो उद्दाम, आक्रमक कसा झाला आणि तिला मुळूमुळू रडायला कसं शिकवलं गेलं, हे खोलवर समजून घेणं गरजेचं आहे. साचेबद्ध स्त्री प्रतिमा, पुरुष प्रतिमा पुरुषप्रधान व्यवस्थेत घडवल्या जातात. त्या मोडून, बाईपणा व पुरुषपणा ओलांडून सर्वांनी माणूसपणाच्या वाटेवर संवेदनशीलतेनं वाटचाल करणं आणि ही वाटचाल सर्वांसाठी सोपी करणं म्हणजे स्त्रीवादी असणं. त्या अर्थानं स्त्री-पुरुष दोघंही स्त्रीवादी असू शकतात, हे लक्षात घेण्याजोगं आहे. म्हणूनच स्त्रीविरुद्ध पुरुष नाही तर, स्त्री आणि पुरुष दोघांनीही पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध लढून स्त्री-पुरुष समता प्रस्थापित करणं महत्त्वाचं.

स्त्री-पुरुष समतेची सुरुवात दोघांनाही आपली प्राथमिक ओळख जे नाव, ते त्रिनाम पद्धतीने लावायला सुरुवात करून करता येईल. यात स्वतःचं पहिलं नाव आणि मग आईचं आणि वडिलांचं पहिलं नाव असतं. यात स्त्री-पुरुष दोघांनीही लग्नानंतर आपलं नाव बदलण्याची गरज नाही. म्हणजे 'वंशाचा दिवा' नाही तर,आईबाबांचं नाव मुलगा- मुलगी दोघंही पुढं चालवणार.

आज अनेक मुली शिकून, अर्थार्जन करून आई-वडिलांना म्हातारपणी आधार देताना दिसतात. सर्वच क्षेत्रांत स्त्रिया आघाडीवर दिसतात. अनेक कुटुंबामध्ये मुलींचं स्वागत होतानाही दिसतंय. मुलगी 'लाडली' बनलेली दिसते आहे. सासरी छळ होत असेल तर

मुलींना माहेरी सुखानं राहता येतं. नवऱ्याशी पटत नाही असं दिसलं तर मुली घटस्फोट घेतायत. या सर्वांची संख्या अत्यल्पच असली तरी आशेला जागा आहे.

आज हिंसा, स्पर्धा वाढत असलेल्या बाजारी जगात मुलींवरची हिंसाही वाढते आहे.ती परिघावर ढकलली जाऊन मोठ्या संख्येनं मुली वंचित-शोषित आहेत. त्यामुळे लाडलीला जगात येण्यावरची बंदी जास्त जास्त तीव्र होईल का अशी धास्ती वाटते. हे टाळण्यासाठी स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरत मुलींना दुय्यमत्वाच्या पिंजऱ्यातून बाहेर काढून त्यांची माणूसपणाची वाट मोकळी करायला हवी. तुम्हाला काय वाटतं?

**गीताली वि. मं.**
saryajani@gmail.com
9822746663

प्रत्येक दिवशी दारात सकाळी सकाळी याचक रूपाने कोणी ना कोणी हजर असतेच. त्या दिवशी रविवार सुट्टीमुळे जरा निवांतच होते, तेवढ्यात एक नऊ-दहा वर्षांची एक कन्या दारात उभी. ''मौवशेव, काहीतरी खायला दे.'' सुट्टी असली तरी माझ्यातली शिक्षिका माझ्यात उपस्थित. मी तिला विचारले, ''तू शाळेत जातेस का? किती शिकलीस? लिहायला वाचायला येतं का?'' ती म्हणाली, ''आम्ही लांब बार्शीकडचं. उस तोडाया आलुया. गावाकडं जात व्हते साळत. पण आता सोडली.''

''तुमची साळा कशी असती? तुम्ही साळत काय शिकवता? मी आली तर चालल का? '' तिच्या या पुढच्या सवालांनी मी विचारप्रवृत्त झाले. माझा एक माजी विद्यार्थी प्रकाश अनभूले याची 'बा म्हणतु' ही कविता आठवली (पालकनीती जानेवारी २०१५ च्या अंकात ती प्रकाशित झाली आहे) आणि तिच्या प्रेरणेतून या ओळी स्फुरल्या-


माय म्हणती,
अगं ये पोरी!
ऊठ रामाच्या पारी
आटप बिगी, उरक न्याहारी
आगं, उन्हं आली डोईवरी
घे गं धाकुलीला धर तिला उरी...

आगं, उरक मागचा पसारा
मग खेळव तिला दारी,
बाप येईल घरा, दे तुकडा पानी
कर सारवासारव, मग धू धुनी...

बाई,
सपान हो माझं एक मनी
आठवतं तवा डोळा येतं पानी
साळंला जवा जात्यात मनी न् जनी
माज्या वाट्याला मातर केर-पोतेरी-धुनी...
मनी दाटतो इचार, बघावं तरी साळंला
कशी आसती साळा उन्हाच्या येळंला?

बाई,
माय माझी जाती जमिदाराच्या शेताला
करती खुरपनी, सोसती उन्हाच्या झळांला
मला नाही हो जायाचं मायंच्या वाटंला
व्हायाचं वो मोठी शिकून तुमच्या साळंला
दावा हो मला कशी आसती ती साळा
त्या साळंसाटी बघा माझा जीव घोटाळला...

**- उर्मिला जगदाळे,** साखरवाडी



# आमचा प्रश्न आमची उत्तरे

- प्रतिभा भराडे



प्रतिभा भराडे सातारा तालुक्यातील कुमठे बीट येथे शिक्षण विस्ताराधिकारी म्हणून २००३ पासून कार्यरत आहेत. कुमठे बीटमधील ४० शाळा त्यांनी ज्ञानरचनावादी पद्धतीने विकसित केल्या आहेत. मुलांच्या मदतीने शेतीचे अनेक प्रयोगही केले आहेत. त्यांची 'कवाडे उघडताच' आणि 'शैक्षणिक प्रकल्प' ही दोन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

सज्जनगडाच्या पायथ्याशी एक गाव आहे. कारी. आठ वस्त्यांचे गाव. कोकणी संस्कृती असलेले. पावसाळ्यात तुफानी पाऊस. या पावसाळ्यात जुलैमध्ये या गावाच्या चौफेर धबधबे वाहतात. काही धबधबे नाचरे आहेत. जोरात येणारा वारा खाली पडणारे पाणी पुन्हा आकाशाकडे नेतो. तुषार उधळत हे पाणी खाली येते.

या गावात जिल्हा परिषदेची सातवीपर्यंतची शाळा आहे. इतर शाळांसारखीच ही शाळा. मुले शाळेत येत होती. मुले-मुली एकत्र शिकत होती. जरा मुली थोराड दिसायला लागल्या की त्यांची लग्नं केली जात. गावात शाळा आहे म्हणून किमान सातवीपर्यंत तरी शिक्षण व्हायचे. या गावात माध्यमिक शाळाही आहे. पण मुलींना क्वचितच या शाळेत जायला मिळायचे.

२००९ साली या गावाच्या प्राथमिक शाळेत एक वीस वयाची शिक्षिका रुजू झाली. माया पवार. आताची श्रीमती माया मोहिते. या शिक्षिकेला दोरीवरच्या मल्लखांबामध्ये छत्रपती पुरस्कार आहे. या शाळेच्या दारात वडाचे कित्येक वर्षांचे जुने अवाढव्य झाड आहे. झाडाभोवती गावाने पार बांधला होता, गावकीची बैठक घेण्यासाठी. पहिले तीन महिने मायाने मुलांना वर्गातील शिक्षण देण्यात घालवले. रोज संध्याकाळी जाताना ती डोळे भरून वडाकडे बघायची.

एक दिवस तिने शाळेसमोर असणाऱ्या वडाला दोर बांधला. साडी बदलून पॅन्ट-शर्ट घातला. या दोरावर ती कसरत करू लागली. समोर प्रेक्षकवर्ग शाळेतील मुले होती. अचंबित होऊन बघणारी. दोरीवर कसरत करणाऱ्या बाई त्यांनी आयुष्यात पहिल्यांदाच बघितल्या होत्या. मुलांनीच काय, गावकऱ्यांनीसुद्धा अशा कसरती पहिल्यांदाच बघितल्या होत्या. मायाच्या सुंदर कसरतींपेक्षा 'पॅन्ट-शर्ट घातलेली बाई' पहिल्यांदाच बघितली होती.

''या बायांनी लाज सोडलीया,'' डोक्यावर पदर ठाकठीक करत एक तरुण सून बोलली. बाकीच्यांनी हो त हो मिळवला. मायाला शाळेत मल्लखांब शिकवायचा होता. गावाचे टोमणे तिने कानाआड केले. मनात जिद्द व संयम या दोन्ही गोष्टी तिच्याकडे उपजत होत्या. पालकांची भेट घेणे, जाणत्या बायकांना भेटणे तिने नियमित सुरू ठेवले. मल्लखांबावरचा गणवेश गावाला न मानवणारा. स्पर्धेसाठी मुलींना हाफ पॅन्ट घालावी लागणार होती. ''आमच्या मुली हाफ पॅन्टमधून गावाला उघड्या मांड्या दाखवणार नाहीत,'' गावातल्या पुढाऱ्याने सांगितले. गावातून आई-वडिलांचेही असेच मत होते. मी लहान मुलींना शिकवते, मायाने मार्ग काढला. पहिली, दुसरीच्या मुली कसरत करू लागल्या. माया त्याच गावात राहिली.

शाळा सुटल्यानंतर या मुलींचा एक तास सराव सुरू झाला. पावसाळ्यात प्रश्न निर्माण झाला. मुलींच्या कसरतीची गावाला सवय झाली होती आणि आई वडिलांनाही पोरींचे कौतुक वाटू लागले होते. त्यांना पावसात देवळात सराव करायला गावातल्या बुजुर्गांनी मान्यता दिली. मुली स्पर्धेत भाग घेऊ लागल्या. सातवीच्या एका मुलीला राज्य स्तरावर सुवर्ण पदक मिळाले. कारी गाव तालुक्याच्या कौतुकाचा विषय झाला. गावाचे कौतुक या खेळामुळे होत होते. गावाने खेळाला राजमान्यता दिली. आता मुली कॉलेजला जातात. त्याच झाडावर हाफ पॅन्टवर सराव करतात. या गणवेशाला मान्यता दिली आहे गावाने. कारी गावातल्या मुलींना तर त्यांचे पालक पाठवतातच खेळायला पण आजूबाजूच्या १४ किलोमीटरच्या परिसरातूनही मुली मल्लखांब शिकण्यासाठी येतात. रोज दोन तास सराव चालतो. संध्याकाळी पाच ते सात. दहा वर्षांत सगळे मनासारखे झाले आहे. या व्यायामशाळेला राष्ट्रीय स्तरावरची चौतीस सुवर्णपदके मिळाली आहेत.

वाटताना सगळे सुरळीत वाटत होते पण गावात कुजबुज सुरू झाली होती. मोठ्या मुली मायाच्या कानात येऊन एक दिवस कुजबुजल्या. मायाच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. मासिक पाळीत मुली देवळात सराव करतात. देवळात शिवताशिवत होत आहे. मुलीना देवळात सराव करू द्यायला नको, असे वातावरण गावात तयार व्हायला लागले होते. व्यायामशाळेत भीतीचे वातावरण तयार झाले. पावसाळ्याचे चार महिने सराव बंद करावा लागणार होता. देवळासारखी सार्वजनिक जागा गावात नव्हती. यापूर्वीही मायाने ग्राम पंचायत, जिल्हा परिषद यांच्याकडे सरावासाठी मोठ्या हॉलची मागणी केली होती. सतत पाठपुरावा केला होता. पण ते शक्य झाले नव्हते.

देव, धर्म, रीतीरिवाज हे संवेदनशील विषय. त्यावर कोणाजवळही शास्त्रीय चर्चा करता येत नव्हती. मायाने जवळच्या एका आजीजवळ व्यथा मांडली. आजीने पाठीवरून हात फिरवला. उद्या मी गावाला एकत्र बोलावते. बोलूया यावर, असे सांगून मायाला शांत केले. (पान १४ वर)

# मुलांचे ऐका!

– नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर

माणूस आणि इतर प्राणी यांच्यात काय फरक आहे असे विचारले तर येणारे पहिले उत्तर म्हणजे भाषा. भाषा हे विचार, भावना आणि कल्पना एकमेकांपर्यंत पोचविण्याचे माणसाच्या हातातले एक प्रभावी साधन आहे. परंतु भाषा हे निव्वळ संवादाचे साधन नसून सखोल व स्वतंत्र विचार करण्यासाठीही ती अत्यावश्यक असते. भाषेविना विचार अशक्य आहे.

शाळेत यशस्वी होण्यासाठी भाषा शिक्षण गरजेचे आहे. ज्या घरात पालक लिहीत व वाचत असतात, अशा घरातील मुले सहज लिहायला वाचायला शिकतात असा आपला सर्वसाधारण अनुभव आहे. मात्र लिहिण्या–वाचण्याचा पाया असणाऱ्या तोंडी भाषेच्या विकासाला मात्र आपण लिहिण्या–वाचण्याइतके महत्त्व देत नाही. तोंडी भाषेचा विकास आणि आणखी काही महत्त्वाचे विकास अगदी बालपणी घरीच सुरू होतात. ज्या मुलांच्या घरी त्यांच्याशी बोलणारी आणि त्यांचे ऐकणारी मोठी माणसे असतात, ती मुले नशीबवान खरी! भाषा विकासात ती इतरांच्या दोन पावले पुढेच असतात. संवादामुळे भाषा अधिक समृद्ध होते व वेगवेगळ्या संदर्भात ती योग्य प्रकारे कशी वापरायची ते कळते. आपल्याला जेव्हा कोणीतरी नवे माणूस भेटते तेव्हा त्याने/तिने आपल्याशी गंभीरपणे बोलावे व आपले गंभीरपणे ऐकावे असे आपल्याला वाटते. या आपल्या संवादातून त्या व्यक्तीसंदर्भात आपली स्वप्रतिमा ठरते. तसेच त्या व्यक्तीबद्दलचे आपले मतही ठरते. त्या संवादातूनच पुढे त्या व्यक्तीशी आपले नाते कसे असेल ते ठरते. सरकारी कार्यालयात नेहमी येणारा अनुभव आठवा. समोरचे माणूस चहा पीत किंवा कोणाशी तरी गप्पा मारीत किंवा खाली बघून आपले काम करीत तुमच्याशी बोलते तेव्हा तुम्हाला काय वाटते? 'एवढं कसलं काम चाललं होतं? अगदी बोलताना बघतसुद्धा नव्हता खडूस माणूस!' असेच म्हणतो ना आपण?





आता लहान बाळाच्या नजरेतून कोणत्याही संवादाकडे पाहू. त्याने नुकतेच आपल्या जगात पदार्पण केले आहे. त्याला सारेच नवे आहे. पडद्याचे हलणे, वाटी चमच्याचा आवाज, बल्बचा उजेड, दुधाची गुळचट चव, सारे सारे त्याच्यासाठी नवे आहे. एवढेच काय पण पोटात गॅस होणे, लंगोट ओला होणे हेही नवेच अनुभव आहेत. स्वतःबद्दल व सभोवतालच्या जगाबद्दल माहिती मिळवण्याचा त्याचा स्रोत म्हणजे आपण, त्याची काळजी घेणारे लोक. लहानपणीच्या अनुभवांवरून ते जगाच्या संदर्भात आपली स्वप्रतिमा बनवीत असते. दोन बाळांचे अनुभव आपण जरा तपासून पाहू. एक बाळ टी.व्ही. लावून त्यासमोर एका बंद खोलीत झोपवले आहे. दुसरे पाळण्यात आहे. पाळण्यावर घुंगरू लावलेले रंगीबेरंगी टांगणाळे आहे. आई स्वयंपाकघरातून अधून–मधून हाक मारून बोलते आहे. उघड्या दरवाजातून बाहेर खेळणारी मुले येऊन बाळाशी खेळून जात आहेत. पहिल्या बाळाची स्वप्रतिमा मी कोणाला नको आहे अशीच होणार तर दुसरे बाळ स्वतःवर व जगावर प्रेम करायला शिकेल. रडणे, हुंकार देणे, समोर कोणीतरी/काहीतरी दिसले तर जोरजोरात हातपाय हालवणे, ही तान्ह्या बाळाची संवादाची रीत आहे. बाळाच्या अशा संवादास प्रतिसाद देणे महत्त्वाचे असते. याचा अर्थ बाळ रडले तर हातातले सगळे काम टाकून लगेच बाळाला उचलून घेणे नव्हे. तर बाळाशी बोलून, स्पर्श करून, जवळ जाऊन त्याला प्रतिसाद देणे व माझे तुझ्याकडे लक्ष आहे हे जाणवून देणे.

मुलांशी बोलणे म्हणजे रोजच्या आयुष्यातील विविध गोष्टींबद्दल व त्यांना ज्यात रस आहे अशा गोष्टींबद्दल त्यांच्याशी बोलणे. यासाठी वेळ द्यावा लागतो. तसेच मुद्दाम प्रयत्नही करावा लागतो. 'कामात' असणारे पालक पुष्कळदा याकडे दुर्लक्ष करतात. उदा. दिवसाच्या शेवटी आई, बाबा दोघेही स्वयंपाक, आवराआवरी, उद्याच्या कामांची तयारी, ऑफिसमधून घरी

आणलेले काम पूर्ण करणे या गडबडीत असतात. अशा वेळी बाळाचे म्हणणे असते की दोघांपैकी एका कोणीतरी हातातले काम बाजूला ठेवून माझ्याशी खेळावे. अशावेळी बहुसंख्य कुटुंबात काय होते?

- बाळाकडे दुर्लक्ष केले जाते.
- आई किंवा बाबा त्याच्यावर ओरडून झोपायला जायला सांगतात.
- मी उद्या तुझ्याबरोबर खेळेन म्हणून सांगतात. (आणि बहुतेक वेळा खेळत नाहीत)

असे जर वारंवार घडत असेल तर मूल त्यातून काय शिकते?

- मला जे पाहिजे ते काही महत्त्वाचे नाही.
- मी काही कुटुंबाचा महत्त्वाचा सदस्य नाही.
- एखाद्याला वचन दिले तरी ते पाळलेच पाहिजे असे नसते.
- माझे विचार व कल्पना इतरांना सांगितले नाहीत तरी चालते.

याउलट पालकांनी जर हे स्पष्ट केले की त्याला थोडी वाट पाहावी लागेल, पण नंतर दोघांपैकी कोणीतरी त्याच्याबरोबर नक्की खेळेल, तर बाळाला दिलासा मिळेल. आपण महत्त्वाचे आहोत याची त्याला खात्री पटेल व आपले विचार व कल्पना इतरांना सांगण्याची प्रेरणा कायम राहील.

मुलांना दिलेले आश्वासन पाळून तुम्ही त्यांच्यासोबत बसलात की स्वतः कमीत कमी बोलून त्यांचे जास्तीत जास्त ऐकून घ्या. जेव्हा त्यांच्या हे लक्षात येते की तुम्ही खरोखरच त्यांचे ऐकून घेत आहात, तेव्हा त्यांना भावनिकदृष्ट्या सुरक्षित वाटते. यानंतर त्यांना जर कशाची चिंता (उदा. आई मला शाळेत घ्यायलाच येणार नाही) किंवा भीती (उदा. केसाळ सुरवंट) वाटत असेल, तर ती ते तुम्हाला बोलून दाखवतील. तसेच त्यांच्या हातून काहीतरी चुकीचे घडल्यास त्याबद्दल तुमच्याशी बोलून त्यातून मार्ग काढायला शिकतील. मुलांच्या भावनिक आरोग्यासाठी हे आवश्यक आहे.

मुलांची कल्पनाशक्ती दांडगी असते. पण आपल्या कल्पना शब्दबद्ध करण्याच्या बाबतीत ती अजून अडखळत असतात. ती बोलत असताना त्यांचे बोलणे मध्येच न तोडता ऐकून घ्या. त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करा आणि योग्य तो प्रतिसाद द्या. उदा. तुमच्या मुलीने एखादे चित्र काढले किंवा स्वलिपीत लिहून तुम्हाला वाचायला दिले तर मुलीच्या मदतीने ती गोष्ट समजून घेण्याचा प्रयत्न करा. गोष्टीबद्दल तिचे बोलणे नीट ऐकून घ्या व प्रतिसाद द्या – 'तुझं कुत्र्याचं चित्र किती छान आहे गं! अगदी तुझ्या गोष्टीत सांगितलंस तसंच काळजीत पडलेलं दिसतंय.' अशा संवादातून मुलांना प्रोत्साहन तर मिळतेच शिवाय कल्पनाशक्तीचा वापर करणे, आपले विचार बोलण्यातून किंवा लेखनातून इतरांसमोर मांडणे यात त्यांना रस वाटू लागतो व त्यामुळे त्यांची ही महत्त्वाची कौशल्ये विकसित होतात.

पालक म्हणून आपण या जबाबदारीकडे गांभीर्याने पाहायला हवे. आपल्या मुलांच्या भविष्यासाठी आपला वेळ आणि आपले कान यांची ही गुंतवणूक अपरिहार्य आहे.

**डॉ. नीलिमा गोखले**
neelima.gokhale@gmail.com
9823053272

**डॉ. मंजिरी निंबकर**
manjunimbkar@gmail.com
9822040586

# आमचा प्रश्न आमची उत्तरे

(पान १२ वरून)

''या आजी नवरात्रीचे उपवास करतात. त्यांनासुद्धा गावातली चर्चा मान्य असणार.'' मुलींच्या एकमेकींतल्या चर्चा माया ऐकत होती. त्या रात्री तिला झोप लागली नाही. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी गावाची सभा बोलावली. झाडून सगळे गाव एकत्र आले. छोट्या-मोठ्या मुलीसुद्धा आल्या. आज या मुलींचे भविष्य गाव ठरवणार होते. मुली फक्त उपस्थित राहतील. चर्चेत कोणीही भाग घ्यायचा नाही. मायाने मुलीना सांगितले होते. मायाही चर्चेत भाग घेणार नव्हती.

''मुलींनी देवळात सराव करायचा नाही असं कुणाला वाटतंय?'' आजीने गावाला विचारले.

''पोरींची शिवताशिवत होते देवाला.'' एका वयस्कर आजोबांनी म्हणणे मांडले. दोन-तीन जणांनी त्यांना साथ दिली.

''कसली शिवताशिवत बाबा? जग कुठं चाललंय? तुम्ही कसला विचार करताय?'' आजीने बोलायला सुरुवात केली. ''या पोरींनी गावाला कुठल्या कुठे नेऊन ठेवलंय बघा. सगळ्या देशात गावाचं नाव झालंय. आणि बाबा, सगळं काही देवानं निर्माण केलं असताना त्याला हे चालणार नाही असं कसं होईल? कुणीही असला विचार करायचा नाय! कुणी पोरींना काय म्हटलं तर गाठ माझ्याशी हाय!'' आजीने गावाला दम दिला. गावातल्या सगळ्या बायका आजीच्या बाजूने उभ्या राहिल्या. कोणालाच यावर काय बोलावे ते सुचेना. ''चला जावा आपापल्या घरी. पोरींनो, खेळा गं बिनधास्त तुम्ही!'' जमलेल्या पोरींच्या चेहऱ्यांवर हास्य पसरले. शाळेत जाऊन शिकलेल्या माणसांना जे मांडता आले नाही ते देवभोळ्या आजीने समर्पक शब्दात मांडून प्रश्न सोडवला. मल्लखांब सराव आता नियमित सुरू आहे.

**– प्रतिभा भराडे**
pratibhabharade@rediffmail.com
9850537660

# हवाओं सी बन रही हैं लडकियाँ...

मार्च महिन्यात बीबीसीने दिल्ली सामूहिक बलात्कार घटनेवर बनवलेला ‘इंडियाज डॉटर’ हा माहितीपट युट्यूबवर पहिला. मी ज्या लिंकवर पाहिला त्या लिंकवर तो दुसऱ्या दिवशी उपलब्ध नव्हता. पण दुसरीकडे कुठेतरी होता. भारतातील त्यावरच्या बंदीच्या सगळ्या गोंधळातही तो कुठे ना कुठेतरी सापडत राहिला आणि बऱ्याचजणांना पाहता आला. त्या माहितीपटावर उमटलेल्या उलटसुलट प्रतिक्रिया, त्याचं कौतुक किंवा त्यावरील आक्षेप यांच्या बारकाव्यांमध्ये मी आत्ता घुसणार नाहीये. मात्र या माहितीपटाच्या निमित्तानं आपला आवाज लोकांपर्यंत पोहचवण्याचं इंटरनेट हे किती प्रभावी माध्यम आहे हे पुन्हा एकदा समोर आलं. आणि या सर्वाचा विचार करताना मी ऑनलाईन पाहिलेले स्त्री-प्रश्नांवर भाष्य करणारे इतर काही व्हिडिओ मला आठवले. त्यातले काही अतिशय ताकदीचे व्हिडिओ तुमच्यापर्यंत पोहोचवावेत असं वाटतं.

**माँ नी मेरी मैं नई डरना**

https://www.youtube.com/watch?v=95kwpSLeDsE




‘स्वांग’ या मुंबईस्थित लेखक, अभिनेते, संगीतकार आणि निर्मात्यांच्या गटानं दिल्ली सामूहिक बलात्कार घटनेनंतर बनवलेला हा व्हिडिओ. खरं तर हे सात मिनिटांचं एक पंजाबी गाणं आहे. स्क्रीनवरच्या काळ्या पार्श्वभूमीवर लाल रंगात लिहिलेले पंजाबी शब्द सरकतात. बरेच शब्द हिंदीच्या जवळ जाणारे असल्यामुळे बऱ्यापैकी अर्थ समजतो. अन्यथा गाण्याचं उत्तम इंग्रजी भाषांतर व्हिडिओमध्ये सबटायटल्सच्या रूपात येतं आणि संपूर्ण भाषांतर व्हिडिओच्या खालीही दिलेलं आहे.

आपल्या संपूर्ण पितृसत्ताक समाजव्यवस्थेला जाब विचारणारं हे गाणं आहे. ‘मुलीला घरी लवकर ये’ असं सांगणारे पालक, अंदाधुंदीच्या परिस्थितीत आपला फायदा करून घेणारे पोलीस व राजकारणी, मुली घरातच शोभून दिसतात असं समजणारा समस्त समाजगट या सर्वांनाच गाण्यात खडसावून सांगितलंय की त्या सहाजणांमध्ये तुम्ही पण सामील होता!’

शिवाय बलात्काराची घटना एकदा घडून गेल्यानंतरच्या लोकांच्या मानसिकतेलाही हे गाणं प्रश्न विचारतं. पुरुषांवरील हल्ला हा केवळ हल्ला, मग स्त्रियांवरच्या हल्लयामध्येच इज्जतीचा प्रश्न कुठून येतो?

‘आई, मी तुझ्यासारखी घाबरट नाही बनणार, मी लढणार, आणि सन्मानानं जगणार’ हे आईला सांगताना मुलगी शेवटी म्हणते,

नाज है मुझको अपने ऊपर
बेबस उनको करके आई,
बेबाकी से हँसने आई
मैं तो वापस बसने आई।

**Opressed Majority**

https://www.youtube.com/watch?v=V4UWxlVvT1

Opressed Majority किंवा शोषित बहुसंख्य ही एक ११ मिनिटांची फ्रेंच शॉर्ट फिल्म. फ्रान्समधल्या एका गावात रोजच्यासारख्याच वाटणाऱ्या एका दिवशी ही काल्पनिक गोष्ट घडते. सगळं नेहमीसारखंच आहे, मात्र एकच फरक. या समाजात स्त्रियांची सत्ता आहे आणि या सत्तेचा उपयोग करून त्यांनी पुरुषांची मुस्कटदाबी चालवली आहे. यात आपल्याला कोपऱ्या-कोपऱ्यावर पुरुषांची टिंगलटवाळी, छेडछाड करत उभ्या असणाऱ्या, रस्त्यावर शिवीगाळ करणाऱ्या, उलटून बोललं म्हणून भयंकर राग येऊन मारहाण, जबरदस्ती करणाऱ्या स्त्रिया पाहायला मिळतात. ऑफिसमधल्या देखण्या पुरुषांशी फ्लर्ट करणाऱ्या आणि नवऱ्याच्या कपड्यांवरून त्यांना टोकणाऱ्या, त्यांना अमुक एका पोशाखाची सक्ती करणाऱ्या, त्यांच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या, त्यांच्या क्षमतांबद्दल शंका असणाऱ्या स्त्रियाही पदोपदी भेटतात. आणि पुरुष? या समाजातील काही पुरुषांनी परिस्थिती जशीच्या तशी स्वीकारली आहे तर काही तिच्याविरुद्ध उभे राहू पाहतायत पण

Published & Posted on 16 May 2015
Posted at Marketyard PSO, Pune 411037.
on 16th of each month

RNI No. MAH MAR 2001/4166
Registered No. PCW/ 026/ 2015-2017

हतबल आहेत.

इथे स्त्रियांच्या इतक्या वर्षांच्या पिळवणुकीचा बदला घेण्याची बात नाहीये. शोषण कुणाचेही असो, ते वाईटच ही भूमिका अत्यंत तरलतेने मांडणारी ही फिल्म पाहणाऱ्याला सुन्न करून टाकते.

**मर्द**

MARD
MEN AGAINST RAPE & DISCRIMINATION

https://www.youtube.com/watch?v=2GPinWKNa84

बलात्कार आणि लिंगभेद यांच्या विरुद्ध असणारे पुरुष म्हणजे खरे मर्द अशा संकल्पनेतून २०१३ मध्ये 'मर्द' ही मोहीम सुरू झाली. या मोहिमेचा चेहरा बनलेली एक कविता खूपच ताकदीची आहे. जावेद अख्तर यांनी लिहिलेली, फरहान अख्तरच्या आवाजातील ही सुंदर हिंदी कविता तथाकथित मर्दपणाच्या सगळ्या संकल्पनांना धक्के देत हळुवारपणे पुढे सरकते. सच्च्या मर्दाबद्दलची 'शराफत', 'तहजीब', 'तमीज', 'आदर', 'हिम्मत', 'आत्मविश्वास', 'साथी' अशी अनेक नामं- विशेषणं वेगवेगळ्या भाषा आणि लिपींमध्ये स्क्रीनवर उमटत राहतात.

या कवितेचं अनेक भारतीय भाषांत रूपांतर झालंय. सचिन तेंडुलकरच्या आवाजातील मराठी रूपांतरात मात्र मूळ कवितेतला भाव पोहचलेला नाही आणि यमक जुळवण्याच्या नादात ती भरकटली आहे असं जाणवतं.

**लडकियाँ**

https://www.youtube.com/watch?v=gR6X45aWKqY

कमला भसीन या लिंगभाव (gender) प्रशिक्षणाचं काम करणाऱ्या एक स्त्रीवादी कार्यकर्त्या. त्यांचं काम आणि लेखन तसं खूप मोठं. पण त्या घराघरात पोहोचल्या ते 'सत्यमेव जयते'च्या एका एपिसोडमुळे. स्त्री-पुरुष समानतेबद्दलचं त्यांचं रोखठोक आणि मिश्किल बोलणं एकदम आवडून गेलं. आणि आता इतक्यातच त्यांची एक सुरेखशी कविता ऐकायला मिळाली- लडकियाँ.

मनसोक्त हसणाऱ्या, बागडणाऱ्या, खेळणाऱ्या, शिकणाऱ्या मुलींच्या दृश्यांच्या पार्श्वभूमीवर कमला भसीन कविता म्हणतात-

हवाओं सी बन रही हैं लडकियाँ
उन्हें बेखौफ चलने में मजा आता है
उन्हें मंजूर नहीं बेवजह रोका जाना

परिंदों सी बन रही हैं लडकियाँ
उन्हें उडने में मजा आता है
उन्हें मंजूर नहीं उनके परों का काटा जाना

फूलों सी बन रही हैं लडकियाँ
उन्हें महकने में मजा आता है
उन्हें मंजूर नहीं तोडकर रौंदा जाना

पहाडों सी बन रही हैं लडकियाँ
उन्हें सर उठा जीने में मजा आता है
उन्हें मंजूर नहीं सर को झुकाकर जीना

और सूरज सी बन रही हैं लडकियाँ
उन्हें चमकने में मजा आता है
उन्हें मंजूर नहीं हरदम परदों से ढका जाना

सकारात्मक ऊर्जेचा खळखळता झरा आहे ही कविता!! जरूर पाहा.




**मधुरा राजवंशी**
rmadhuraa@gmail.com
8275369702